MHKO190004852022

**<u>निशाणी क्र.१७ खालील आदेश</u>**

**IN**

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१९१ /२०२२</u>**

**<u>पुंडलिक रामचंद्र माने वि.. साताप्पा दत्तु माने</u>**

**<u>(दिनांकः१६/०८/२०२३)</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) नुसार वादपत्र नाकारण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे सदर अर्जावरच म्हणणे देण्यात आले व त्याने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

३. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादीने प्रतिवादीचे आई कडून प्रतिवादी हा अज्ञान असताना दावा मिळकतींचे खरेदीखत करुन घेतले आहे. परंतू हिंदु अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६ चे कलम ८(२) प्रमाणे न्यायालयाची कोणतीही परवानगी घेतल्याचे दिसुन येत नाही. सदर खरेदीखतामध्ये अज्ञान प्रतिवादीचे कल्याणाकरीता खरेदीखत केले आहे असे नमुद नाही. तसेच सदर खरेदीखतास तुकडे बंदी तुकडे जोड कायद्याची बाधा येते. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजूर करावा व वादपत्र नाकारण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. याउलट वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत अर्जातील कथनें पाहीली असता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) नुसार वादपत्र नाकारण्यासाठी ती पुरेशी नाहीत. प्रस्तुत प्रकरणात सदर कायदेशीर तरतुद लागू पडत नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

६.		प्रस्तुत प्रकरणात खालील नमुद विचाराधीन प्रश्न माझे समक्ष उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी खाली नमूद कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत वादपत्र दिवाणी प्रकिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) नुसार नाकरणेस पात्र आहे का? | ..नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबत</u>**

७.		प्रस्तुत प्रकरणातील वादपत्राचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा मौजे आकनुर, ता. राधानगरी येथील गट क्र.८६५ मधील ११ आर व गट क्र.६४८ मधील ७.७६ पैकी ४ आणे हिस्सा या मिळकतीं त्याचे मालकीच्या आहेत असे हक्कज्ञापन मिळणेसाठी व सदर दोन्ही मिळकतींमध्ये असलेल्या त्याचे कब्जे वहीवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करू नये म्हणुन कायम मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

८.		कायद्याचे प्रस्थापीत तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ७ नियम ११ नुसारचा अर्ज निकाली करताना केवळ वादपत्रातील कथनेच विचारात घ्यावी लागतात व वादपत्र नाकारायचेच असेल तर ते संपूर्णपणे नाकारावे लागते. वादपत्र तुकडयामध्ये नाकारता येत नाही.

९.		वादपत्रामध्ये वादीने गट क्र.८६५ व गट क्र.६४८ मध्ये त्याची कब्जेवहीवाट आहे व तो दावा मिळकतींमध्ये पिके घेत आहे असे नमुद आहे. वादीने प्रतिवादीविरुध्द कायम मनाई हुकूम मागीतला आहे. वादपत्रामध्ये जरी हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियमनुसार आवश्यक परवानगी घेतली किंवा नाही याचा उल्लेख नसला तरी सदर मुद्याबाबत अंतिम चौकशीचे वेळी विचार करणे योग्य होईल. तसेच सदर वादपत्रातील दावा मिळकतींचे क्षेत्र कमी असल्याने तुकडे बंदी व तुकडे जोड कायद्याची वादपत्रास बाधा येते किंवा कसे हा मुद्दा सुध्दा अंतिम चौकशीच्या वेळी विचारात घेणे योग्य होईल. वादीने वर नमूद दोन्ही गटामधे त्याचा

कब्जा आहे असे वादपत्रात कथन करुन प्रतिवादी विरुध्द कायम मनाई हुकूम मागीतला आहे. अशा परिस्थीतीत वादपत्र याक्षणी नाकारता येणार नाही या निष्कर्षा प्रत मी येत आहे. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबत**

१०. वर नमुद चर्चेअंती व विचाराधीन प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेता, प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Digitally signed by DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Date: 2023.08.17 11:58:22 +0530

दिनांक. १६/०८/२०२३

**( डी. एम. जी. मलिदवाले )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, राधानगरी.